**पट्टेरी वाघ**

पट्टेरी वाघ हा मांजराच्या वर्गातील सर्वात मोठा वन्य प्राणी आहे. शक्यतो वाघ हा वाघीणीपेक्षा मोठा असतो. पट्टेरी वाघाचे वजन ७०० पौंड असू शकते. वाघ हा शिकारी प्राणी असून तो एकट्याने शिकार करतो. वाघ सहसा हरीण तसेच काळवीटाची शिकार करतो. वाघाचा रंग पिवळा असून त्याच्या अंगावर काळया रंगाचे पट्टे असतात. अशा रंगामुळे वाघ झाडा-झुडुपांमध्ये सहज लपू शकतो. पट्टेरी वाघ आशियात आणि विशेषतः भारतात दिसून येतात.

**खालील शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा.**

पट्टे, भारत, मांजर, शिकारी

१. पट्टेरी वाघ हा -------------------------------- वर्गातील सर्वात मोठा प्राणी आहे.

२. वाघ हा ---------------------------- प्राणी आहे.

३. वाघाच्या अंगावर ------------------------- असतात.

४. वाघ शक्यतो --------------------------- दिसून येतात.

**खालील विधाने चूक अथवा बरोबर आहेत ते लिहा.**

१. वाघ हा कुत्र्याच्या वर्गातील प्राणी आहे. ----------------------

२. वाघीण ही वाघापेक्षा मोठी असते. ------------------------

३. वाघ शक्यतो एकट्याने शिकार करतो. ---------------------------

४. पट्टेरी वाघ हा अमेरिकेत दिसून येतो. --------------------------

(त्रिवेणी मराठी शाळा - वाचन सराव)